Maharashtra Mandal mmla Los Angeles

भरारी

महाराष्ट्र मंडळ लॉस एंजेल्स वृत्त | मार्च २०१४

प्रिय वाचकहो,

सर्वप्रथम मंडळातर्फे सगळ्यांना होळीसाठी 'हार्दिक' शुभेच्छा!!! जानेवारीतल्या संक्रांतीनंतर आपली भेट आता ह्या वृत्तामार्फत होते आहे. आपल्या बाल मित्रांनी संक्रांतीला आपली खूप करमणूक केली. ह्या बालमित्रांच्या बरोबरीने आपापले व्यवसाय सांभाळून ह्या मुलांना भरघोस उत्तेजन देणाऱ्या उत्साही पालकांचेहि कौतुक करावेसे वाटते. आता मंडळाचा पुढील कार्यक्रम म्हणजे "आनंदमेळा"! हा कार्यक्रम सर्व वयोगटांसाठी आहे. विविध खेळ, व खाण्याच्या वस्तू तसेच काही खेळांच्या स्पर्धा ह्या कार्यक्रमात ठेवण्यात येतील.

८ मार्च रोजी मंडळानी आयोजित केलेल्या हायकिंगच्या सहली खूप यशस्वी झाल्या. मित्रमंडळी व लहान थोर कुटुंबियांसमवेत घेतलेला हा निसर्ग सौंदर्याचा आस्वाद मनाला प्रफुल्लीत करून गेला. Simi Valley, Irvine, Valencia आणि Cerritos ह्या शहरातून स्थानिक निसर्ग प्रेमिकांनी ह्या सहलीत उत्साहाने भाग घेतला.

१७ मे रोजी संगीतकार कौशल ह्यांचा संगीताचा "कौशल कट्टा" हा सदाबहार कार्यक्रम सदर केला जाईल. 'कौशल कट्टा' हा कार्यक्रम कौशल इनामदार सादर करणार आहेत. मुळात अभिनयापासून कौशलचा प्रवास सुरु झाला आणि आता हा प्रवास एकांकिका लेखन, गीतलेखन, टि. व्ही. मालिकांचा लेखन, ललित लेखन ह्या सगळ्या वाटांना स्पर्श करत झाला आहे. या प्रवासात पु.ल. देशपांडे आणि अमिताभ बच्चन ह्यासारख्या नामवंत लोकांची शाबासकीची थापही कौशलच्या पाठीवर पडली आहे. 'अमृताचा वसा', 'मराठी अभिमान गीत', 'बालगंधर्व' आणि आता 'अजिंठा' पर्यंतचा कौशलचा प्रवास अतिशय रोमहर्षक झाला आहे. 'गाणं' म्हटलं कि आधी शब्द कि आधी 'चाल' आणि त्यामागे काय गोष्ट आहे याची उत्तर जाणून घेण्याकरता चला जाऊया 'कौशल कट्ट्याला'!!!! तसेच ७ व ८ जूनला मंडळ आपणांसाठी भारतातून तीन दर्जेदार मराठी नाटके आणीत आहे. ह्या नाटकांबरोबरच एकांकिका स्पर्धाही ठेवल्या आहेत. आपले स्थानिक कलाकार दरवर्षी प्रमाणे ह्या एकांकिका स्पर्धांमध्ये भाग घेतील. ह्या कार्यक्रमांसाठी आपण सर्वांना मंडळातर्फे अत्यंत अगत्याचे आमंत्रण आहे हे सांगणे न लगे !!!!!

-----**प्रज्ञा कुवाडेकर**

महाराष्ट्र मंडळा तर्फे गुढी पाडव्याच्या आणि नूतन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा!!

<u>अध्यक्षांच्या दृष्टीकोनांतून ध्येये आणि प्रगती:</u>

नमस्कार मंडळी,

गुढी पाडव्याच्या आणि नूतन वर्षाच्या तुम्हा सर्वांना शुभेच्छा!!! २०१४ चा संक्रातीचा कार्यक्रम अविस्मरणीय करण्या बद्दल सर्व स्वयंसेवक आणि कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व लहान मुलाचे धन्यवाद. गेले तीन महिने MMLA ची समिती स्थानिक प्रतिभांना प्रोत्साहन देणे आणि लॉस एंजेल्स जवळच्या सर्व मराठी लोकांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. याच उद्देशाने अरवाइन मध्ये लहान मुलांचा कार्यक्रम आणि सिमी व्हॅली मध्ये "नाट्य कार्यशाळा" हे उपग्रह कार्यक्रम (Satellite Events) आयोजित केले गेले. दोन्ही कार्यक्रमात उत्तम प्रतिसाद मिळाला. "नाट्य कार्यशाळा" हा नवीन प्रयोग अभिव्यक्ती या स्थानिक ग्रुप बरोबर आयोजित केला गेला. मोठ्या संख्येने स्थानिक कलाकारांनी यात भाग घेतला आणि जून महिन्यात होणारा एकांकिका सर्ध्येची पूर्व तयारी केली.

'हायकिंग डे' हा या वर्षी सुरु केलेला आजून एक नवीन उपक्रम. लॉस एंजेल्स भागातील सर्व प्रकारच्या लोकांनी एकत्र येउन एक चांगली गोष्ट करायची इतका साधा उद्देश या मागे होता. सुमारे २०० पेक्षा जास्त लोक लॉस एंजेल्स ८ भागात हाईकला गेले. एकंदरीत अनुभव सर्व हायकिंग गटांचा साठी विलक्षण होता. बराच गटांनी नियमित प्रमाणे हाईकला जाण्याचे या नंतर ठरवले आहे. २०१४ समिती देखील नियमितपणे या हायकिंग दिवसचे आयोजन करेल.

पुढच्या काही महिन्यात स्थानिक प्रतिभांना वाव देण्याबरोबर विविध प्रकारचे कार्यक्रम आणण्याची योजना आहे. तुम्ही सर्व आंनद मेळात चविष्ट पदार्थचा आस्वाद घाल आणि विविध खेळामध्ये भाग घ्याल याची मला पूर्ण खात्री आहे . मे महिन्यात बृहन महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने आम्ही सुप्रसिद्ध संगीतकार आणि मराठी अभिमान गीताचे संगीतकार कौशल इनामदार यांचा गाजणारा कार्यक्रम "कौशल कट्टा" आपल्या सर्वांसाठी घेऊन येत आहोत. गेल्या वर्षाच्या एकांकिका सर्धेच्या यशा मुळे आम्ही या वर्षी पण एकांकिक स्पर्धा आयोजित करत आहोत. अनेक स्थानिक कलाकार या संधीचा फायदा घेऊन २०१५ बृहन महाराष्ट्र मंडळ अधिवेशनासाठी तयारी करतील अशी अपेक्षा आहे. याच वेळेला बृहन महाराष्ट्र मंडळ २०१५ समिती बरोबर २०१४ ची समिती लॉस एंजेल्स मध्ये नाट्य मोहोत्सव आयोजित करणार आहे. हा नाट्य महोत्सव २०१५ बृहन महाराष्ट्र मंडळ अधिवेशनासाठी देणगी गोळा करण्यासाठी असेल. ७ आणि ८ जून रोजी होणाऱ्या नाट्य मोहोत्सवात "काटकोन त्रिकोण", "रेवेती देशपांडे " आणि "प्राइस टॅग" हि गाजलेली नाटकं सादर केली जातील.

याच बरोबर एप्रिल महिन्यात स्थानिक कलाकारांनी सादर केकेल्या "गीत भागवीत गीता" आणि लॉस एंजेल्स च्या Indian Film Festival मध्ये निवड झालेला आणि अंतराष्ट्रीय स्थरावर गाजणारा मराठी सिनेमा "Fandri" बधण्याची संधी आपल्या सर्वांना मिळणार आहे. तुम्ही सर्व MMLA च्या विविध उपक्रम आनंद घेत आहात अशी आशा आहे.

सचिन सोनटक्के

अध्यक्ष २०१४

संक्रांतीच्या कार्यक्रमाच्या काही झलकी

सदस्यांच्या सदिच्छा:

संपादिका सौ. प्रज्ञा कुवाडेकर तसेच सर्व कार्यकारी मंडळास सप्रेम नमस्कार, विनंती विशेष. कळविण्यास आनंद वाटतो कि सध्या होणारे महाराष्ट्र मंडळाचे कार्यक्रम अविस्मरणीय तर होतच आहेत यात जराही शंका नाही. श्री. शेट्ये आणि श्री. सोनटक्के यांच्या अनुपम अध्यक्षतेखाली सर्वच सभासदांची अंग मोडून केलेली मेहनत कामास येत आहे याचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे हे कळविण्यास अभिमान वाटतो. असेच कार्यक्रम सतत होत राहोत आणि महाराष्ट्र मंडळांच्या सर्व सभासदांचा तसेच प्रेक्षकांचा मंडळाला नुसताच 'हार्दिक' नव्हे तर 'आर्थिक' पण पाठींबा मिळो आणि आत्तापर्यंतच्या कारकिर्दीत मंडळाने धडाडीने मारलेली हि "भरारी" गगनाला गवसणी घालणारी ठरो हीच सदिच्छा व्यक्त करून फिरून एकदा कार्यकारी मंडळाचे अभिनंदन करू पत्र संपवतो.

कळावे,

एक सभासद, मधुकर कुंभोजकर

शिव जयंतीच्या निमित्ताने

निष्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू} । श्रीमंत योगी ॥

नरपति हयपति गजपति। गडपति भूपति जळपति।
पुरंदर आणि शक्ति । पृष्ठभागी ॥

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥

आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणे सुशील । सकळा ठायीं ॥

धीर उदार गंभीर । शूर क्रियेसि तत्पर ।
सावधपणे नृपवर । तुच्छ केले ॥

देव धर्म गोब्राम्हण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥

या भूमंडळचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हा कारणे ॥

कित्येक दुष्ट संहारिला। कित्येकांसि धाक सुटला ।
कित्येकांस आश्रयो जाहला । शिवकल्याणराजा ॥

श्रद्धांजली: कै. प्रमिला हरी भाटे

श्रीमती प्रमिला भाटे ह्यांचे १४ जानेवारी २०१४ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी santa ana कॅलिफोर्निया येथे निधन झाले प्रमिलाताई अमेरिकाला पहिल्यांदा १९७० साली एका वर्षासाठी त्यांच्या मुलीकडे लॉस अन्जेलेसला आल्या होत्या. नंतर १९८४ पासून त्या व त्यांचे पती कै. हरिभाऊ भाटे अमेरिकेत स्थायिक झाले. कै. हरिभाऊ सत्यनारायण पूजा, विवाह, मुंज,वास्तुशांती इत्यादी धार्मिक विधी लॉस अन्जेलेस परिसरातील मराठी नागरिकांसाठी करीत असत. त्यांना त्या कार्यात प्रमिलाताई सक्रिय सहभाग देत असत. प्रमिलाताई लेखनाची व चित्रकलेची आवड होती. त्यांचे काही लेख पुण्याच्या सकाळमध्ये प्रसिद्ध झाले होते. हरिभाऊ व प्रमिलाताई एका भजनी मंडळातही भाग घेत असत. महाराष्ट्र मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमाला दोघेही आवर्जून उपस्थित असत. पतीप्रमाणेच प्रमिलाताई यांचे व्यक्तिमत्व नेहमी प्रसन्न व आनंददायी असे. दोघेही मित्रमंडळीच्या अडीअडचणीला धाऊन जात आसत. कौटुंबिक धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात प्रमिलाताई एक उत्साहामूर्ती होत्या. त्यांचे मोकळे हास्य व आपुलकीचे शब्द परिचितांच्या नित्य स्मरणात राहतील.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती आणि शांती देवो. **---- श्रीनिवास माटे**

समाजकार्य

आठवणींच्या झोपाळ्यांवर झुलू लागे झुला,
भूतकाळात दडलेली दृश्ये दिसू लागली मला.
बालपणात बागडत आले आणि तारुण्यात नाचत गेले मोराच्या तालावर,
चाळीशी लागताच नवी दृष्टी मला लाभली तिला ठेवताच डोळ्यांवर.
पण साठी मध्ये दिसू लागल्या होत्या औषधांच्या बाटल्या टेबलावर,
आयुष्यभर 'मी' 'मला' आणि 'माझ्या' या आत्मकेंद्री वृत्तीभोवतीच फिरले,
समाजाची देवाण घेवाण करायलाच विसरले.
पुढील जन्म मनुष्याचा देशील करे देवा ?
पृथ्वीवर येऊन समाजाची निश्चितच करीन सेवा. **- आशा सावंत**

कविता: रीत जगाची

एक श्रांत हत्ती
बसे तरू खाली
घ्यावया विश्रांती
उन्हे सरता गरज संपली
उन्मळून टाके तो वृक्ष करत ची ची
का अशी असते रीत जगाची ?

- मीनल अष्टेकर

खास 'होळीसाठी' टीप:
पुरणपोळीच्या बाहेरील आवरणाच्या पिठात मैद्याच्या निम्मे गव्हाचे पीठ बारीक चाळणीने चालून एकत्र मऊ भिजवले तर पोळ्या चवीला छान होतात.

--प्रज्ञा कुवाडेकर

सदस्यांचा आढावा: २०१४ साली महाराष्ट्र मंडळात आतापर्यंत २७० सदस्य आहेत. ह्या वर्षी हा आकडा ५०० पर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्र मंडळ स्वयंसेवकांसाठी लिंक:
https://mmla.wildapricot.org/volunteers

बृहन महाराष्ट्र मंडळ स्वयंसेवकांसाठी लिंक:
http://BMM2015.org/volunteers

महाराष्ट्र मंडळ सदस्यांसाठी लिंक: https://mmla.wildapricot.org/membership

Website: www.mmla.org

Twitter: MaharashtraMandal LA @mmla_tweet

Facebook: http://www.facebook.com/maharashtra.mandal

संपादिका : प्रज्ञा कुवाडेकर

वृत्त सजावट : सुप्रिया बेलपाठक कुलकर्णी

आपले लेख, कथा , कविता, इत्यादि कृपया bharari@mmla.org ला पाठवावेत